जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 04-02-2020

तरुण भारत

**चर्चासत्र :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बेटी बचाओ अभियानाअंतर्गत 'गर्ल चाईल्ड इन महाराष्ट्र: इशुज ॲन्ड प्रॉस्पेक्टस" या विषयावर चर्चासत्र. स्थळ : मानव्यशास्त्र सभागृह, शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी १० वाजता.

लोकमत

# 'नॅनो टेक्नॉलॉजी'मुळे जगणे सुसह्य

## पी. एस. पाटील : 'सायबर'मधील आनंद ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रत्येक माणसाला कमी मोबदल्यात आधुनिक सुखसुविधांची गरज भासत आहे. या अपेक्षित गोष्टी नॅनो टेक्नॉलॉजीच्या वापरामुळे शक्य होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी रविवारी येथे केले.

येथील छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्चचे (सायबर) संस्थापक डॉ. ए. डी. शिंदे यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित 'आनंद ग्रंथोत्सवा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. त्यांचा विषय '२१ वे शतक व नॅनो टेक्नॉलॉजी' असा होता. अध्यक्षस्थानी 'सायबर'चे विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे होते.

या कार्यक्रमास 'सायबर'चे संचालक डॉ. प्रदीप बायचळ, बाबू झकेरिया, डी. टी. विचारे, प्राचार्य ए. आर. कुलकर्णी, सुनील शिंदे उपस्थित होते. डॉ. कृष्णात चौगले यांनी प्रास्ताविक केले. सुरेश आपटे यांनी सूत्रसंचालन केले. अजय शिंदे यांनी आभार मानले. दरम्यान, उद्या, मंगळवारपर्यंत हा ग्रंथोत्सव सर्वांसाठी खुला राहणार आहे.

### रक्तदान शिबिर, कलाकृतींचे प्रदर्शन आज

आज, सोमवारी सकाळी १० वाजता ए. डी. शिंदे यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या उपस्थितीत पुष्पांजली अर्पण केली जाणार आहे. त्यानंतर रक्तदान शिबिर होणार आहे. महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी साकारलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन यावेळी भरविण्यात आले आहे.

- 'बेटी बचाओ' चर्चासत्र : 'बेटी बचाओ' अभियानांतर्गत चर्चासत्र. विषय : 'गर्ल चाईल्ड इन महाराष्ट्र : इशुज अँड प्रॉस्पेक्टस'. स्थळ : मानव्यशास्त्र सभागृह, शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी १० वा.

# विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च ते एप्रिल २०२० मध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमाच्या एकूण ६८० परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. २७ मार्चपासून सुरू होणाऱ्या परीक्षांसाठी ३ फेब्रुवारीपासून परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याबाबत सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## सेट परीक्षा २८ जून रोजी

भारतीय कंपनी सचिव संस्थान यांच्यावतीने कंपनी सेक्रेटरी परीक्षा ६ व ७ जून रोजी होणार आहे. २९ मार्च व २५ व २६ एप्रिल रोजी स्वयम परीक्षा होणार आहे. २८ जून रोजी सेट परीक्षा आहे. राज्य शासनातर्फे 'एमएचटी-सीईटी' सामायिक प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

परीक्षांच्या नियोजनामध्ये विज्ञान, व्यावसायिक अभ्यासक्रम, वाणिज्य व व्यवस्थापन व मानव्यशास्त्र या चार विभागांच्या परीक्षांचे वेळापत्रक तयार केले आहे. एकूण ६८० परीक्षांसाठी विद्यापीठ अधिविभाग व अखत्यारीत येणाऱ्या महाविद्यालयातील सुमारे तीन लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. ३ ते १७ फेब्रुवारी या कालावधीत विनाविलंब शुल्क भरून ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत. त्यानंतर मार्चच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अतिविलंब शुल्कासह अर्ज करता येतील. हस्तलिखित अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

# 'संशोधन पद्धती' वर विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर टाइम्स टीम

'संशोधनाची एक विशिष्ट भाषा आणि कार्यपद्धती असते. विद्यार्थ्यांनी संशोधन करत असताना ती भाषा आणि कार्यपद्धती आत्मसात करावी,' असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक व अनुवादक तसेच हैद्राबाद येथील इंग्रजी आणि विदेशी भाषा विद्यापीठाच्या माजी कुलगुरु प्रा. माया पंडीत -नारकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे आयोजित 'संशोधन पद्धती' या विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. मुंबई विद्यापीठाचे माजी इंग्रजी अधिविभागप्रमुख प्रा. रामभाऊ बडोदे यांचेही यावेळी भाषण झाले. यावेळी ३०० संशोधन मार्गदर्शक, संशोधन विद्यार्थी आणि पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.

यावेळी प्रा. पंडित यांनी संशोधन कार्यपद्धतीमधील अनेक बारकावे आणि संशोधन तत्वप्रणाली याबाबत सखोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये बडोदे यांनी संपूर्ण संशोधन पद्धती राबवताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी आणि संभाव्य धोके कसे टाळावे याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. अक्षय सरवदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd. 1962
NAAC 'A' Grade

## ५६वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना

- विद्यापीठाचा ५६वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी १०.४५ वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री. भगतसिंह कोश्यारी, मा. कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली हे उपस्थित राहणार आहेत.
- ५६व्या दीक्षांत समारंभामध्ये गतवर्षीप्रमाणेच महाराष्ट्र शासनाच्या सुधारित परिनियमानुसार पदवी प्रमाणपत्रे वितरण प्रक्रिया राबविली जाणार आहे.
- दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अहवालानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचे खादी सलवार कुर्ता/कमीझ किंवा जोधपुरी (पुरुषांसाठी) व पांढऱ्या/मोती रंगाची खादीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.
- ज्या विद्यार्थ्यांनी टपालाद्वारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प, अर्ज भरताना निवडला आहे त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झाल्यावर एक महिन्यानंतर अर्जावरील पत्त्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.
- सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना Through College असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठाच्या वितरण व्यवस्थेमधून देण्यात येतील. यासाठी सर्व महाविद्यालयांनी प्राचार्य अथवा जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांस अधिकार पत्रासह पाठवावे. जेणेकरुन संबंधितांकडे उपरोक्तप्रमाणे अर्ज केलेल्या स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे हस्तांतरीत करण्यात येतील. महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्यांची संख्या, नावे, विद्यापीठ संकेतस्थळावर Convocation सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

  (टीप : महाविद्यालयांमार्फत पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्यास येणाऱ्या प्राचार्य/प्रशासकीय सेवक/प्रतिनिधी यांचेसोबत महाविद्यालयाच्या ओळखपत्राची साक्षांकित प्रत व अधिकारपत्र असणे अनिवार्य आहे)
- एम. फील., पीएच.डी. स्नातक व विद्यापीठाच्या विविध अधिविभागातील स्नातकांना विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर दुपारी १.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या वितरण व्यवस्थेद्वारे पदवी प्रमाणपत्रे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्र प्राप्त करता येईल)
- दूरशिक्षण अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झाल्यावर एक महिन्यानंतर अर्जावरील पत्त्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.
- ५६व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या पारितोषिकप्राप्त, व्यासपीठाव्यतिरिक्त पारितोषिकप्राप्त तसेच पीएच.डी. स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रांसाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/56con-voction) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**दीक्षांत विभाग,**

दि. : ०४/०२/२०२०

सही/-

**श्री. गजानन पळसे,**

प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ.

# उन्हाळी सत्र परीक्षा ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

● **वेळापत्रक जाहीर; ६८० परीक्षा, कार्यक्षेत्रात ३ लाख विद्यार्थी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च, एप्रिल २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षांसाठी सोमवारपासून विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्यास प्रारंभ झाला. २७ मार्चपासून परीक्षांना सुरुवात होणार असून वेळापत्रक जाहीर झाले आहे.

६८० परीक्षांसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे ३ लाख विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. ३ ते १७ फेब्रुवारी विनाविलंब शुल्क ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत. त्यानंतर मार्चच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अतिविलंब शुल्कासह अर्ज करता येतील. सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यात यावेत. हस्तलिखीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. परीक्षा अर्ज भरण्यासाठी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

# ग्रामीण पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे : डॉ. रत्नाकर पंडित

## पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनच्या वतीने कळेत कार्यशाळा

**कळे : पुढारी वृत्तसेवा**

ग्रामीण पत्रकारितेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे वाचकांच्या अपेक्षाही त्या प्रमाणात वाढल्या असून ग्रामीण भागामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून वस्तुनिष्ठ व अचूक माहिती वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रामाणिकपणे करावे, असे आवाहन पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. रत्नाकर पंडित यांनी केले.



**कळे : येथे पत्रकार कार्यशाळेचे उद्घाटन रोपाला पाणी घालून करताना समन्वयक डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. शिवाजी जाधव, प्रा. कृष्णात खोत, जि. प. सदस्य सर्जेराव पाटील व मान्यवर.**

येथील कै. दादू जीवबा पाटील स्मृतिस्थळावर शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री डॉ. कै. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन व पश्चिम पन्हाळा ग्रामीण पत्रकार संघ यांच्या वतीने आयोजित 'ग्रामीण पत्रकारितेसमोरील आव्हाने' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. उद्घाटक म्हणून साहित्यिक प्रा. कृष्णात खोत होते. अध्यक्षस्थानी जि. प. सदस्य सर्जेराव पाटील होते. आद्यपत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजनाने व रोपाला पाणी घालून मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळेचे व कै. दादू जीवबा पाटील कृषी-विज्ञान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रा. कृष्णात खोत यांनी मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रामध्ये अध्यासनाचे सहायक प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांनी बातमी लेखनाची कौशल्ये व वैशिष्ट्ये सांगितली. रवींद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. धनाजी पाटील यांनी आभार मानले. यावेळी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभिषेक श्रीरामला राष्ट्रपती सुवर्णपदक

## शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात होणार गौरव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभात अभिषेक दादासाहेब श्रीराम याला राष्ट्रपती सुवर्णपदकाने, तर कीर्ती दत्तात्रय ननवरे हिला कुलपती मेडलने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.



अभिषेक श्रीराम हा विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागामध्ये एमएचे शिक्षण घेत आहे. त्याने न्यू कॉलेजमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. महाविद्यालयात असताना तो महाविद्यालयाचा जीएस होता. त्या काळात त्याने एनसीसी पूर्ण केले आहे. एमएचे शिक्षण घेत असताना तो एनएसएसमध्ये स्वयंसेवक आहे. आई आणि वडील दोघेही शिक्षक असल्याने ▸▸ पान ७ वर

# अभिषेक श्रीरामला राष्ट्रपती सुवर्णपदक

(पान १ वरून) शिक्षणाचा समृद्ध वारसा अभिषेकला लाभला. त्याने यापूर्वी पारधी भाषेवर संशोधन केले. सध्या तो स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वापरावर संशोधन करत आहे. भविष्यात त्याला सेट व नेट पूर्ण करावयाचे आहे. सर्व भाषा विषयांतर्गत एमए संस्कृत विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळावल्याबद्दल संस्कृत विभागाच्या कीर्ती ननवरेला कुलपती पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. कीर्ती ही कृष्णनगर सातारा येथील रहिवासी आहे. तिचे वडील शेतकरी असून आई गृहिणी आहे. तिने पदवीचे शिक्षण छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे पूर्ण केले असून, एमए संस्कृतचे शिक्षणही त्याच महविद्यालयात घेत आहे.

**इतर उपक्रमांचा लाभ**

महाविद्यालय ते विद्यापीठस्तरावरील विविध उपक्रमांत नेहमीच अग्रेसर सहभाग घेतला. त्यामुळे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू घडत गेले. एनसीसी आणि एनएसएस याच्या माध्यमातून समाजभान निर्माण झाले. शिक्षणाबरोबरच इतर उपक्रमांतील सहभागामुळेच हा गौरव होत आहे. **-अभिषेक श्रीराम**

**कष्टाचे चीज झाले**

पदवीपर्यंतचे शिक्षण, पदव्युत्तर शिक्षण घेत असताना झोकून देऊन अभ्यास केला. नेहमीच कष्ट करत राहिले, त्यामुळे इतका मोठा सन्मान होत आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्राध्यापक म्हणून ज्ञानदानाचे काम करावयाचे आहे. पदक जाहीर होणे हा अतिशय आनंदाचा क्षण आहे.

**-कीर्ती ननवरे**

# नॅनोटेक्नॉलॉजीमुळे जगणे सुसह्य : पाटील

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आधुनिक युगात प्रत्येक माणसाला कमी मोबदल्यात आधुनिक सुख-सुविधांची गरज भासत आहे. या अपेक्षित गोष्टी नॅनोटेक्नॉलॉजीच्या वापरामुळे शक्य होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यपीठाचे पदार्थ विज्ञान विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.



कोल्हापूर : आनंद ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. व्ही. एम. हिलगे, डॉ. बाबू झकेरिया, डी. टी. विचारे, प्रदीप वायचळ, प्राचार्य ए. आर. कुलकर्णी, सुनील शिंदे आदी.

सायबरचे संस्थापक डॉ. ए. डी. शिंदे यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित आनंद ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी '२१ वे शतक व नॅनोटेक्नॉलॉजी' या विषयावर डॉ. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी सायबरचे विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे होते. डॉ. पाटील म्हणाले, 'सध्या जगभरात विशेष करून विकसित देशांमध्ये मोठ्या प्रमाणात नॅनोटेक्नॉलॉजी आधारित संशोधनावर मोठ्या प्रमाणात खर्च व गुंतवणूक केली जात असून बदलत्या काळानुरूप तंत्रज्ञान विकसित करण्यावर त्यांचा भर आहे. भारतातही या टेक्नॉलॉजीच्या वापरास व संशोधनास गती मिळत आहे.

प्रास्ताविक डॉ. कृष्णात चौगले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुरेश आपटे यांनी केले. आभार डॉ. अजय शिंदे यांनी मानले. या विचारमंचावर सायबरचे संचालक डॉ. प्रदीप वायचळ, सुनील शिंदे उपस्थित होते. सकाळच्या सत्रात डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते आनंद ग्रंथोत्सवाचे उद्घाटन झाले.

# दीक्षांत सोहळ्यात खादी कपड्याचा वापर

## मिरवणुकीत ड्रेसकोड; सलवार-कुर्ता आणि मोरपंखी रंगाच्या जॅकेटचा पोशाख

अर्चना बनगे : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३ : येथील शिवाजी विद्यापीठाच्या ५६वा दीक्षांत समारंभ सोहळ्यात यंदा खादी कपड्याचा वापर होणार असून यावर्षी सोहळ्याच्या मिरवणुकीत खादी ड्रेसकोड असणार आहे. त्यात खादी सलवार-कुर्ता आणि मोरपंखी रंगाचे जॅकेट असा पोशाख असेल.**



खादी कापड



पदवीदान समारंभात अनेकांना आकर्षण असते ते ड्रेसकोडचे. विद्यापीठाच्या आवारात ड्रेसकोड आणि पदवी प्रमाणपत्र घेऊन आयुष्यातील अविस्मरणीय क्षण अनेकजण छायाचित्राच्या माध्यमातून टिपतात. अनेक वर्षे शिवाजी विद्यापीठाचा ड्रेसकोड ठरलेला आहे. यावर्षी मात्र त्यात बदल होणार आहे.

महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विद्यापीठाने पदवीदान सोहळ्यात खादी कपडे वापरण्यास प्राधान्य द्यावे, अशी सूचना यूजीसीने दिली आहे. या सूचनेचे पालन करत शिवाजी विद्यापीठाने या दीक्षांत समारंभात अकॅडमिक आणि मॅनेजमेंट समितीने खादी सलवार कुर्ता आणि मोरपंखी रंगाच्या जाकेट असा ड्रेस कोड केला आहे. शिवाय पदवीदान सोहळ्यात पदवी प्रमाणपत्र पारितोषिके स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांनी खादी कापड वापरावे, यासाठी आवाहन केले आहे. खादी कापड हे केवळ सांस्कृतिकदृष्टीने नाही तर सर्वच ऋतूंत हे शारीरिकदृष्ट्या अनुकूल आहे. शिवाय महात्मा गांधींनी स्वातंत्र्यलढ्यात खादीचा उपयोग इंग्रजांविरुद्ध शस्त्रासारखा केला होता, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव रजनीश जैन यांनी म्हटले आहे. त्यामुळे महाविद्यालय स्तरावर होणाऱ्या पदवीप्रदान कार्यक्रमात खादीचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

### यंदा वेगळा स्टोल

यंदाच्या मानववस्त्राचा रंग पांढरा नसून केसरी असणार आहे. हा स्टोल २ मीटर लांब ७ इंच रुंद आणि १,१ इंच किनारपट्टीचा असणार आहे. तसेच त्यावर विद्यापीठाचे दोन लोगो व विद्यापीठाचे नाव, अशा पद्धतीच्या हा स्टोल असणार आहे.

**“ विद्यापीठ आयोगाच्या सूचनेनुसार दीक्षांत सोहळ्यात आम्ही प्रथमच असा बदल करणार आहोत. यातून यावर्षी नक्कीच वेगळी झलक या कार्यक्रमात पाहावयास मिळेल.**

**- गजानन पळसे,**
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ.

# विद्यापीठात आज राज्यस्तरीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये बेटी बचाओ अभियानाअंतर्गत उद्या (ता. ४) सकाळी दहा वाजता 'गर्ल चाईल्ड इन महाराष्ट्र : इशुज अॅन्ड प्रॉस्पेक्टस' यावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. हे चर्चासत्र विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होणार आहे.

# 'सकाळ'च्या 'यिन'मुळे घडलो...!

## राष्ट्रपती सुवर्णपदक विजेत्या अभिषेकची भावना

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : 'सकाळ'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क-'यिन' या व्यासपीठाच्या माध्यमातून घडलो. याच व्यासपीठावरून चालणाऱ्या विविध उपक्रमांतून आत्मविश्वास मिळाला आणि तीच शिदोरी घेऊन आता भाषाशास्त्रातील विविध संशोधनावर भर दिला असल्याची भावना आज शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक विजेत्या अभिषेक श्रीराम याने व्यक्त केली. गुरुवारी (ता.६) शिवाजी



अभिषेक श्रीराम

विद्यापीठात होणाऱ्या ५६ व्या दीक्षांत सोहळ्यात त्याचा या पदकाने गौरव होणार आहे. या पार्श्वभूमीवर तो बोलत होता.

अभिषेक म्हणाला, ''न्यू कॉलेजला शिकत असताना मी 'यिन'चा सभासद झालो. सलग चार वर्षे या व्यासपीठाच्या माध्यमातून विविध उपक्रमांत सहभाग घेतला. नवरात्रोत्सवातील वाहतुकीचे नियंत्रण असो किंवा गणेशोत्सवातील पर्यावरणपूरक विसर्जन उपक्रम असो प्रत्येक उपक्रमात सक्रीय सहभागी झालो. त्यातून सामाजिक जाणिवा अधिक समृध्द होत गेल्या. महाविद्यालयात आणि शिवाजी विद्यापीठात शिकत असताना 'बेटी बचाओ' सारखे उपक्रम असोत किंवा 'एनसीसी', 'एनएसएस'च्या माध्यमातूनही विविध संकल्पनांवर भर दिला. 'यिन'च्या 'यूथ इन्स्पिरेटर्स ॲवॉर्ड'नेही गेल्या वर्षी सन्मान झाला आहे.''

मी राहायला शिवाजी पेठ महाकाली तालीम परिसरात. सध्या विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत असून, गेल्या वर्षी पारधी समाजाच्या भाषेवर संशोधन केले आणि सध्या लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेबाबतचा दृष्टिकोन या विषयावर विशेष अभ्यास सुरू असल्याचेही अभिषेक सांगतो.

### आनंद आणि जबाबदारीही वाढली...



कीर्ती ननवरे

कुलपती पदकाने यंदाच्या दीक्षांत सोहळ्यात माझा सन्मान होत असल्याचा आनंद जरूर आहे. पण, त्याचवेळी जबाबदारीही वाढली असल्याच्या भावना कीर्ती ननवरे हिने व्यक्त केल्या. ती मुळची सातारा येथील. वडील शेतकरी आणि आई खासगी नोकरी करते. संस्कृत विषयातून ती पदव्युत्तर शिक्षण घेत असून, सर्व भाषा विषयांतर्गत सर्व प्रथम आल्याबद्दल तिचा हा गौरव होणार आहे. सध्या 'नेट'-'सेट'ची तयारी सुरू असल्याचेही ती आवर्जून सांगते.

### विद्यापीठात गुरुवारी दीक्षांत समारंभ

पान ५ वर »

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. ०५-०२-२०२०

तरुण भारत

# दीक्षांत समारंभात खादीचा प्रचार, प्रसार

## गुरुवारी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ : ६० हजार स्नातकांना होणार पदवी प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवार, ६ रोजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पार पडणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन हे प्रमुख उपस्थित असणार आहेत. अध्यक्षस्थान राज्यपाल भगतसिंह कोश्यारी भूषविणार आहेत. दरम्यान पदवीदान समारंभात खादीचा प्रचार आणि प्रसार केला जाणार आहे.

पदवीदान समारंभात २०६५, महाविद्यालयामार्फत ३५ हजार ६६८ तर पोस्टद्वारे २२,४३४ अशा एकूण ६० हजार १६७ स्नातकांना पदवीदान करण्यात येणार आहे. यंदाचे राष्ट्रपती सुवर्णपदक अभिषेक श्रीराम दादासाहेब यास तर कुलपतींचे पदक एमए संस्कृतमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या कीर्ती दत्तात्रय ननवरे यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू शिंदे म्हणाले, दीक्षांत समारंभासाठी विविध समित्या स्थापन



करण्यात आल्या आहेत. विविध विषयांमध्ये पीएचडी पदवीप्राप्त स्नातकांची एकूण संख्या ३५३ इतकी आहे. पत्रकार परिषदेला प्र. कुलगुरु डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा प्रभारी संचालक गजानन पळसे, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत उपस्थित होत्या.

### विद्यार्थी, प्राध्यपकांना ड्रेसकोड

विद्यापीठ अमुदान आयोगाने खादीचा प्रसार आणि प्रचार करण्याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. यानुसार यंदाच्या दीक्षांत समारंभामध्ये विद्यार्थ्यांनी खादीचे कपडे वापरण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आले आहे. मुलांना पांढऱ्या रंगाचा शर्ट किंवा सदरा त्यावर जॅकेट तसेच मुलींना मोती कलरचा ड्रेसकोड दिला आहे. विद्यापीठातील प्राध्यापकांनाही याच रंगाचा ड्रेसकोड आहे.

### मुलींची बाजी

यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणाऱ्या स्नातकांमध्ये ९११ मुले तर ११५४ मुली, महाविद्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या पदवीप्रमाणपत्रामध्ये १६ हजार ५४६ मुले तर १९ हजार १२२ मुली, पोस्टामार्फत १० हजार २४४ मुलांना तर १२ हजार १९० मुलींना पदवीचे वितरण करण्यात येणार आहे.

### अभिषेक दादासाहेब राष्ट्रपतीपदक, कीर्ती ननवरे कुलपती पदकाची मानकरी

क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र, एनसीसी, एनएसएसमधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरलेल्या कोल्हापूरच्या अभिषेक श्रीराम दादासाहेब याला यंदाचे राष्ट्रपती सुवर्णपदक देण्यात येणार आहे. तर एमए अभ्यासक्रमातील संस्कृत विषयामध्ये सर्वाधिक गुण पटकावणाऱ्या साताऱ्याच्या कीर्ती दत्तात्रय ननवरे हिला कुलपती पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. ०५-०२-२०२० तरुण भारत



डॉ. जगदीश जाधव
jagdishjadhav20@gmail.com
(लेखक राजस्थान केंद्रीय विश्वविद्यालय, अजमेर येथे समाजकार्य विषयाचे अध्यापन करतात)

# अक्षरांचे ते घेता वाण; बहु कठीण परिणामी

'सतीचे ते घेता वाण' हा संत तुकारामांचा अभंग कठीण कामे चिवटपणे पूर्ण करणाऱ्या वीजुगिषी वृत्तीविषयी आहे. कष्टाची तमा न बाळगता, निष्ठेने 'असिधारा' व्रत जोपासणाऱ्या निश्चयाविषयी आहे. लिखाणाचे व्रत सतीच्या वाणासारखेच कठीण काम आहे. तशात 'मौलिक' लिहिणारी माणसे ही जर शीर्षस्थ प्रशासनामधील असतील तर त्याच्या कार्याला कुर्निसातच व्हावा. प्रशासनामधल्या माणसांच्या लिखाणाचे वाचकांना अप्रूप असते. निवृत्तीनंतर लिहिणाऱ्या प्रशासकांइतकाच किंबहुना जास्त आदर सेवेत असून अक्षरसेवा करणाऱ्या साहित्यिकांना लाभतो. उच्च शिक्षण क्षेत्रात चटकन डोळ्यापुढे येणारी नावेही अनेक आहेत. कुलगुरुपद भूषविलेल्या प्रो. शिवाजी सावंत, प्रो. द. ना. धनागरे, प्रो. नागनाथ कोत्तापल्ले, प्रो. पंडित विद्यासागर यासारख्या धुरीणांसोबतच जेष्ठ वैज्ञानिक शास्त्रज्ञ प्रो. रघुनाथ माशेलकर, प्रो. जयंत नारळीकर आदि वैज्ञानिकांनी मराठी साहित्य समृद्धच केले आहे.

विद्यापीठ जगतात 'कुलसचिव' हे पद अनेक भाराने वाकलेले असते. शिक्षकी पिंड आणि सुसंवादी वृत्ती जिवंत ठेवून साहित्य सेवेत नियमितता असलेल्या प्रशासकांची संख्याही दुर्मिळ आहे. विद्यापीठ प्रशासनात हुद्याने आणि वृत्तीने प्राध्यापक असणारे प्रशासक हे अनेकदा अनिच्छेने, तडजोड म्हणून किंबहुना पुढील पदोन्नतीचा राजमार्ग म्हणून आलेले असतात. विद्यापीठ प्रशासन किंवा शैक्षणिक प्रशासन सृजनशील वृत्तीने, कल्पकतेने, संवादाने निर्मितीक्षम करता येते, या धारणेची माणसे तुलनेने कमी आढळतात. जीवनकेंद्री-विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोन, आस्वादक चिंतनशील वृत्ती आणि मानवतावादी धारणा असणाऱ्या डॉ. विलास नेताजी शिंदे या शिवाजी विद्यापीठातील ज्येष्ठ प्रशासकाचे नुकतेच 'आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया' हे विज्ञानावरील तब्बल चारशे छत्तीस पानांचे पुस्तक, या पुस्तकाची प्रेरणा ठरलेल्या दोन विद्यार्थ्यांना प्रथम प्रत अर्पित करून अभिनवतेने ऑनलाईन प्रकाशित झाले आहे.



डॉ. व्ही. एन. शिंदे

डॉ. शिंदे हे सोलापूरमधल्या बार्शी तालुक्यातील चिंचोली गावचे. मराठवाड्याच्या सीमेवरील या गावात रझाकारांच्या काळात सुरक्षेसाठी सैनिकांचा पडाव असायचा. परिणामी चिंचोलीचे, 'कॅम्प चिंचोली' असेही नाव आहे. तालुक्याच्या गावी बारावी झाल्यावर पुढील शिक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक्स विषय न मिळाल्यामुळे ते सोलापुरात दयानंद महाविद्यालयामध्ये आले (१९८६). या काळापर्यंत महाराष्ट्रातील महाविद्यालये प्राचार्यांच्या नावाने ओळखली जात असत. सोलापुरात के. भोगिशयन सर म्हणजे संगमेश्वर, जी. आर. शहा सर म्हणजे वालचंद आणि नंतरच्या काळात डॉ. नागेश धायगुडे म्हणजे दयानंद हे समीकरण होते. धायगुडे सरांच्या प्रभावामुळेच त्यांनी भौतिकशास्त्र हा विषय घेऊन पदवी मिळवली. पुढे शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण आणि विद्यावाचस्पती पदवी मिळवली. सुरुवातीला बारामती आणि तदनंतर शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र असणाऱ्या पदार्थ विज्ञानशास्त्र अधिविभागात ते अधिव्याख्याता राहिले. शिक्षकी पेशातील त्यांची घरातील चौथी पिढी आहे. पुढील प्रवास प्रशासकीय कारकिर्दीचा आणि लेखनाचा आहे. शिवाजी विद्यापीठात उप कुलसचिव ते प्रभारी कुलसचिव आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दोन वर्षे कुलसचिव म्हणून त्यांची प्रशासकीय कामगिरी देदीप्यमान राहिलेली आहे. नांदेड विद्यापीठातील वृक्षारोपण आणि शिवाजी विद्यापीठातील जलसंधारण या त्यांच्या सांघिक कामांचे दृष्य परिणाम आपण पाहू शकतो. समर्पित भावनेने सुशासित प्रशासन देणारा हा माणूस माणसात, वाचनात आणि लिखाणात रमतो. अनेक प्रासंगिक संदर्भांचा धांडोळा घेत, ओघवत्या शैलीत, प्रसन्न आणि वाचनीय सामाजिक ललित निबंध प्रकारात डॉ. शिंदे अविरतपणे लिहित आहेत. डॉ. शिंदे सरांच्या 'आवर्त सारणी' या पुस्तकाच्या निर्मितीमागील गोष्ट मोठी प्रेरक आहे. मूलद्रव्यांच्या आवर्त सारणीला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संयुक्त राष्ट्र संघाने २०१९ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय आवर्त सारणी' वर्ष साजरे करण्याची घोषणा केली होती. या घटनेचे औचित्य साधून त्यांनी त्यांच्या स्तंभामध्ये 'धन्यवाद मेंडेलिव' नावाचा लेख लिहिला होता. हा लेख वाचून यश आंबोळे नावाच्या विद्यार्थ्याने सरांकडे विज्ञान दिनानिमित्त, 'आवर्त सारणी' या विषयावर त्याच्या महाविद्यालयामध्ये व्याख्यान देण्याचा आग्रह धरला. सरांनी 'रसायन शास्त्र' हा माझा विषय नाही, असे सांगत हे आमंत्रण नाकारण्याचा प्रयत्न केला. अखेरीस विद्यार्थ्यांच्या उत्साहापुढे शरणागती पत्करत मोठ्या तयारीनिशी मार्च महिन्यात त्यांनी व्याख्यान दिले. मार्च महिन्यात, दहावीची परीक्षा तोंडावर असताना म. गांधी विद्यालय, सरुड या शाळेची विद्यार्थिनी आर्या कोळेकर तिच्या आई-वडिलांसह या व्याख्यानाला उपस्थित होती. परीक्षा झाल्यानंतर तिच्या विज्ञान जिज्ञासेपोटी ती सरांना पुन्हा भेटली. हे दोन विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील शिक्षकांचे विज्ञान कुतूहल जाणवून सरांनी हे ११८ मूलद्रव्यांवरील पुस्तक मराठीमध्ये करण्याचा निश्चय केला. हा लेखन संकल्प त्यांनी २०१९ मध्येच पूर्ण केला. विज्ञान रंजक, सोपे आणि सहज लक्षात राहण्याजोगे करण्याचा त्यांचा प्रयत्न वाचताना लक्षात येतो. पूर्वाश्रमीचा पदार्थ विज्ञानाचा एक प्राध्यापक भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र, कृषी शास्त्र, भूगर्भ शास्त्र आणि सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये आपली प्रशासकीय कामे सांभाळून लीलयेने मुशाफिरी करीत असतो. हे विलोभनीय आहे आणि अनुकरणीय देखील आहे.

मराठी ही ज्ञान व्यवहार भाषा व्हावी असे अनेकांना वाटत असते. विज्ञानाचे सुलभीकरण होऊन त्यातील गूढता कमी व्हावी याबाबतही अनेकजण चिंता व्यक्त करीत असतात. यासाठी धोरणात्मक पाठिंबा आणि संस्थात्मक पाठबळाचीही आवश्यकता आहे. प्रादेशिक भाषेमध्ये आलेल्या पुस्तकांना आणि संशोधन लेखांना विद्यापीठीय श्रेयांक पद्धतीमध्ये सन्मानाने आणि इंग्रजीच्या बरोबरीने पाहिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. व्यावहारिक गरजांपोटी मातृभाषांमध्ये ज्ञान व्यवहारांना आणण्याच्या प्रयत्नांना शिक्षक संशोधक स्वतःच दुय्यमत्व देतात. धोरणात्मक चौकटी आखणाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय परिघ आणि प्रलोभन नाकारणाऱ्या डॉ. व्ही. एन. शिंदे सरांचे कष्ट आणि त्याग समजून घेण्याची आवश्यकता आहे.

दीक्षांत समारंभ गुरुवारी : भगतसिंह कोश्यारी, भूषण पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती

# अभिषेक श्रीरामला राष्ट्रपती सुवर्णपदक

## साताराच्या कीर्ती ननवरे हिला कुलपतिपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी यावर्षी कोल्हापूरचा अभिषेक दादासाहेब श्रीराम हा ठरला. सातारा येथील कीर्ती दत्तात्रय ननवरे हिने कुलपती पदक मिळविले. या पदकांच्या वितरणासह ६०,१६७ स्नातकांना विद्यापीठाच्या वतीने यंदाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभात गुरुवारी (दि. ६) पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. स्नातकांची यावर्षीची संख्या विक्रमी आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सोमवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, दीक्षान्त समारंभ गुरुवारी सकाळी पावणेअकरा वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तर विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन प्रमुख उपस्थित असणार आहेत. विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला अभिषेक श्रीराम हा विद्यापीठात एम. ए. इंग्लिश अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात शिकत आहे. एम. ए. अभ्यासक्रमातील संस्कृत या विषयामध्ये सर्वाधिक गुणांसह कीर्ती ननवरे हिने कुलपती पदक पटकाविले.

प्रभारी संचालक पळसे म्हणाले, शासन परिनियमानुसार यावर्षी विद्यापीठातील अधिविभागांतील स्नातक, पीएच. डी.धारकांना दीक्षान्त समारंभात पदवी प्रदान केली जाणार आहे. त्यांची संख्या २०६५ आहे. यावर्षी पदवी प्रदान केल्या जाणाऱ्या स्नातकांमध्ये विद्यार्थिनी आघाडीवर आहेत. त्यांची संख्या ३२,४६६ आहे. महाविद्यालयातील स्नातकांना 'ग्रॅज्युएशन डे सेरेमनी' (पदवी प्रदान सोहळा)च्या माध्यमातून पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत म्हणाल्या, दीक्षान्त समारंभानिमित्त उद्या, बुधवारपासून दोन दिवसीय ग्रंथमहोत्सव आणि गुरुवारी सकाळी ग्रंथदिंडी आयोजित केली आहे. या पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणारे स्नातक : २०६५
- महाविद्यालयामार्फत पदवी घेणारे : ३५,६६८
- पोस्टाद्वारे पदवी घेणारे : २२,४३४

शाखानिहाय स्नातक

- विज्ञान व तंत्रज्ञान : २९,२३६
- वाणिज्य व व्यवस्थापन : १४६४०
- मानव्यविद्या :१४,६४५
- आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम : १६४६

### शिक्षक, शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी

अभिषेक याची आई वनिता या कोडोली येथील यशवंत हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून, तर वडील दादासाहेब हे श्री शिव-शाहू महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. कीर्तीचे वडील दत्तात्रय हे शेतकरी असून, आई अरुणा या गृहिणी आहेत.

"माझ्यासमोर यापूर्वी हे पदक मिळविणाऱ्या श्रेयस मोहिते, प्रियांका पाटील यांचा आदर्श घेऊन विद्यापीठातील विविध उपक्रमांमध्ये सहभागी झालो. माझ्या यशात आई-वडील, भाऊ, शिक्षक आणि मित्रांचा मोठा वाटा आहे. मला भविष्यात भाषाशास्त्रामध्ये संशोधन करण्यासह प्राध्यापक म्हणून काम करायचे आहे. गेल्या वर्षी पारधी भाषेबाबत संशोधन केले होते. सध्या स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी हे इंग्रजीचा अभ्यास कशा पद्धतीने करतात यावर संशोधन करीत आहे. व्यक्तिमत्व विकासासाठी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभागी झाले पाहिजे.



- **अभिषेक श्रीराम**, कोल्हापूर

"अभ्यासात सातत्य, भरपूर सराव आणि कायम स्वत:ला अपडेट करुन घेण्याची सवय असल्यामुळे मी हे यश मिळवू शकले. माझ्या यशाचे श्रेय पालकांबरोबरच शिवाजी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनाही आहे. माझ्या मनातील प्रत्येक शंकेचे निरसन करण्यासाठी त्यांनी कधीही घड्याळ बघितलं नाही. या विषयाचा जास्तीत जास्त अभ्यास करण्यासाठी पुस्तकंही प्राध्यापकांनीच उपलब्ध करुन दिली. भविष्यात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून काम करण्याची इच्छा आहे.




- **कीर्ती ननवरे**, सातारा

# ननवरे, श्रीराम पदकांचे मानकरी

## शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ गुरुवारी


भगतसिंग कोश्यारी


डॉ. भूषण पटवर्धन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ गुरुवारी ६ फेब्रुवारी रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत व विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. राजमाता जिजाऊ सभामंडपात सकाळी दहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावर्षी ६० हजार १६७ स्नातकांना पदवी तर ३५३ विद्यार्थ्यांना पीएचडी पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. यंदाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकासाठी कोल्हापूरच्या अभिषेक श्रीराम याची तर कुलपती पदकासाठी साताऱ्याच्या कीर्ती ननवरे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आहे', अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रकुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, ग्रंथपाल डॉ.नमिता खोत आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'यावर्षी पदवीधर होणाऱ्या ६० हजार स्नातकांमध्ये ३२ हजार ४६६ मुलींचा समावेश असून उच्च शिक्षणात पदवीधर होण्यात यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. या समारंभात २०१९ मध्ये पदवी व पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यावर्षी दीक्षान्त कार्यक्रमात प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र स्वीकारणाऱ्या स्नातकांची संख्या २०६५ असून यामध्ये ११५४ मुली तर ९११ मुले आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील अधिविभागातील पदव्युत्तर पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाच समावेश आहे. महाविद्यालयांमध्ये पदवी प्रमाणपत्र स्वीकारणाऱ्या स्नातकांची संख्या ३५ हजार ६६८ इतकी असून यामध्ये १९१२२ मुली तर १६५४६ मुले आहेत. पोस्टाने पदवी प्रमाणपत्र स्वीकारणाऱ्या स्नातकांची संख्या २२५३४ असून यापैकी १२१९० मुली तर ९३४४ मुले आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यासशाखेतून पदवी घेणाऱ्या एकूण २९ हजार विद्यार्थ्यांपैकी मुलींची संख्या १४ हजार इतकी आहे. आजपर्यंतच्या दीक्षान्त समारंभापैकी यंदाच्या समारंभात सर्वाधिक पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

### ग्रंथदिंडीसह ग्रंथमहोत्सवाचे आयोजन

दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथमहोत्सवास उद्या, बुधवारपासून प्रारंभ होणार आहे, अशी माहिती ग्रंथपाल डॉ. खोत यांनी दिली. ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहासमोरील मंडपात सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. सायंकाळी सहा वाजता 'गीतबहार' हा विद्यापीठाच्या संगीत व नाट्यविभागातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. गुरूवारी (ता. ६) सकाळी साडेसात वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे.

### ३५३ संशोधकांना पदवी

दीक्षान्त समारंभात विविध अभ्यासशाखांमधील पदवीदान कार्यक्रमाबरोबरच विविध विषयात संशोधन केलेल्या विद्यार्थ्यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात येणार आहे. यावर्षी ३५३ संशोधक पीएचडी पदवी स्वीकारणार आहेत. यामध्ये ४३ विद्यार्थ्यांना व्यासपीठावर पदवीप्रदान करण्यात येणार आहे.




### कुलपती पदकाची मानकरी कीर्ती ननवरे



साताऱ्यातील शेतकरी कुटुंबातील कीर्ती ननवरे ही सर्व भाषांअंतर्गत संस्कृत विषयात विद्यापीठात प्रथम येत कुलपती सुवर्णपदकाची मानकरी ठरली. अत्यंत सामान्य कुटुंबातील कीर्तीने उच्चशिक्षणासाठी संस्कृत या विषयाच्या अभ्यासाची निवड करून भाषा व इतिहास यांची नाळ जोडून ठेवण्याचा ध्यास घेतला आहे. सातारा येथील अण्णासाहेब कल्याणी विद्यालयात कीर्तीचे शालेय शिक्षण झाले असून शिवाजी कॉलेजमधून तिने संस्कृत विषयातून एम.ए.पूर्ण केले आहे. तिला वाचनाचा छंद असून संस्कृत विषयात अध्यापनामध्ये तिला करिअर करायचे आहे. कीर्तीचे वडील दत्तात्रय शेती करतात, तर आई गृहिणी आहे.

### राष्ट्रपती पदक विजेता अभिषेक श्रीराम



राष्ट्रपती पदक विजेता अभिषेक श्रीराम याचे शालेय शिक्षण प्रायव्हेट हायस्कूल तर महाविद्यालयीन शिक्षण न्यू कॉलेजमध्ये झाले आहे. त्याने इंग्रजी विषयात एम.ए.केले आहे. अभिषेकचे वडील दादासाहेब हे सरूड येथील शिवशाहू विद्यालय येथे शिक्षक तर आई वनिता यशवंत एकनाथ हायस्कूल कोडोली येथे शिक्षिका आहे. न्यू कॉलेजचे जीएस पद यशस्वीपणे सांभाळलेल्या अभिषेकने एनएसएस व एनसीसीमध्ये उल्लेखनीय काम केले आहे. उंचगाव परिसरात राहणाऱ्या पारधी समाजाच्या भाषेवर त्याने संशोधन केले असून भविष्यात, ज्या भाषा लोप पावत आहेत त्या जतन करण्यासाठी संशोधन करण्याची त्याची इच्छा आहे.

### यंदा खादीचा होणार प्रसार

दीक्षान्त समारंभातून पारंपरिक गाऊन हद्दपार झाला असून यावर्षी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार दीक्षान्त समारंभात शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिकारी वर्ग खादीचा पेहराव परिधान करून सहभागी होणार आहे. त्यामुळे पुरुषांसाठी पांढऱ्या रंगाचा खादीचा कुर्ता तर महिलांसाठी मोती रंगाची खादीची साडी हे यंदाच्या दीक्षान्त समारंभाचे वेगळे वैशिष्ट्य ठरणार आहे.

# शिवाजी विद्यापीठात बेटी बचाओ अभियानांतर्गत आज राज्यस्तरीय चर्चासत्र

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : शिवाजी विद्यापीठामध्ये बेटी बचाओ अभियानांतर्गत मंगळवारी (दि. ४) सकाळी दहा वाजता 'गर्ल चाईल्ड इन महाराष्ट्र : इश्युज ॲन्ड प्रॉस्पेक्टस्' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये हे चर्चासत्र होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या वतीने देण्यात आली.

# विद्यापीठाचा 'सेट'मध्ये राज्यात डंका

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण होऊन नोकरी मिळवावी हे अनेकांचे स्वप्न असते. गेल्या पाच वर्षांतील आकडेवारीत इतर विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा परीक्षेत डंका असल्याचे दिसून आले आहे.

दरवर्षी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने (यूजीसी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत राज्य पात्रता परीक्षा (सेट) घेण्यात येते. यात भाषा, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, वाणिज्य आणि व्यवस्थापन असे ३९ विषय आहेत. शिवाजी विद्यापीठ संलग्नित २५० हून अधिक महाविद्यालयातून लाखो विद्यार्थी सेट परीक्षा देतात. यावर्षी सेट परीक्षेचा पॅटर्न बदलला आहे. यापूर्वी परीक्षेला ४०० गुणांचे तीन पेपर होते. बदललेल्या परीक्षा पद्धतीनुसार आता दोनच पेपर असून, पहिला पेपर शंभर व दुसरा पेपर दोनशे गुणांचा आहे. परीक्षेत बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात.

> "शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सेट परीक्षेत उज्ज्वल कामगिरी केली आहे. नॅकला समोरे जाताना मानांकनात ही भर घालणारी गोष्ट आहे. विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्रितपणे घेतलेल्या कष्टाचे हे फळ आहे.
>
> **- प्रा. डॉ. प्रशांत अनभुले,**
> समन्वयक, सेट परीक्षा,
> शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठाच्या सेट परीक्षा विभागाच्यात गेल्या पाच वर्षांतील सांख्यिकी माहिती उपलब्ध आहे. डिसेंबर - २०१३ (उत्तीर्ण ३३०), सप्टेंबर-२०१५ (३८८), मे-२०१६ (३३३), एप्रिल-२०१७ (२७७), जानेवारी-२०१८ (३६८) उत्तीर्ण झाले आहेत. परंतु, गेल्या काही वर्षांत शिक्षकांची भरती झालेली नाही. या रिक्त जागांवर सेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शिवाजी विद्यापीठाचा गुरुवारी दीक्षांत समारंभ

## ‘यूजीसी’चे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन प्रमुख पाहुणे; राज्यपाल कोश्यारी भूषविणार अध्यक्षस्थान


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवारी (दि. ६) सकाळी १०.४५ वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोग, (यूजीसी) नवी दिल्लीचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन उपस्थित राहणार आहेत. समारंभाचे अध्यक्षस्थान राज्यपाल व कुलपती भगतसिंह कोश्यारी भूषविणार आहेत.

यावर्षीच्या दीक्षांत समारंभातील राष्ट्रपती सुवर्णपदक शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागातील अभिषेक श्रीराम व कुलपती मेडल साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजची कीर्ती ननवरे हिला जाहीर झाले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

दीक्षांत समारंभात विविध विषयांमध्ये संशोधन अभ्यासक्रम पूर्ण करून पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या स्नातकांची संख्या ३५३ आहे. त्यापैकी ४३ स्नातकांना व्यासपीठावर व उर्वरित ३१० स्नातकांना व्यासपीठाव्यतिरिक्त पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात प्रत्यक्ष उपस्थित राहून २,०६५, संलग्नित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालयांमार्फत ३५,६६८ व पोस्टाद्वारे २२,४३४ असे एकूण मिळून ६०,१६७ पदवी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. पदवी प्रमाणपत्र वाटपासाठी विद्यापीठात १० स्टॉल लावण्यात येणार आहेत.

दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. भूषण पटवर्धन हे ‘यूजीसी’चे उपाध्यक्ष व जैववैद्यकीय शास्त्रज्ञ आहेत. सार्वजनिक आरोग्य व आयुर्वेद विषयावर त्यांचे मोठे काम आहे. नॅशनल अ‍ॅकॅडमी सायन्स व नॅशनल अ‍ॅकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सचे ते सदस्य आहेत. त्यांनी नियोजन आयोग, आयुष मंत्रालयासह विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समित्यांवर काम केले आहे. त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या नावे भारतीय ८ व अमेरिकन २ पेटंट व ८,१०० सायटेशन आहेत. त्यांचे २० लेख शंभरपेक्षा अधिक वेळा अभ्यासासाठी वापरण्यात आले आहेत.



डॉ. भूषण पटवर्धन



शिवाजी विद्यापीठातून...

या स्टॉलवर जिल्हानिहाय पदवी प्रमाणपत्रांचे वितरण होणार आहे. शासन परिनियमानुसार गतवर्षीप्रमाणे पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ महाविद्यालयस्तरावर करण्यात येणार आहे. त्याबाबतची नियमावली विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे.

दीक्षांतसमारंभाचे औचित्यसाधून सलग १४ व्या ग्रंथमहोत्सव-२०२०’ कार्यक्रमाचे आयोजन दि. ५ व ६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. यात भारतीय व परदेशी कंपन्यांचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डिजिटल ग्रंथ आदींचे ३० स्टॉल लावण्यात येणार आहेत. दि. ५ रोजी सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहाजवळ ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता ‘गीत बहार’ हा संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. दि. ६ रोजी सकाळी ७.३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला सुरुवात होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार आहे. पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रानुसार शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना खादी पोशाख परिधान करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. त्यानुसार दीक्षांत समारंभात अधिकार मंडळ पदाधिकाऱ्यांचा सलवार-कुर्ता व जॅकेट असा पोशाख असेल. त्यावर केशरी रंगाचे मानवस्त्र असणार आहे.

या समारंभात सर्वात जास्त ६०,१६७ पदवी प्रमाणपत्रे प्रदान होणार आहेत. यात सर्वाधिक १९,१२२ विद्यार्थिनी आहेत, हे वैशिष्ट्य आहे. विज्ञान व तंत्रज्ञान (२९,२३६), वाणिज्य आणि व्यवस्थापन (१४,६४०), मानव्यशास्त्र (१४,६४५), आंतर-विद्याशाखा अभ्यासक्रम (१,६४६) पदवी प्रमाणपत्रांचा समावेश आहे.


## अभिषेक श्रीरामला राष्ट्रपती सुवर्ण; कीर्ती ननवरेला कुलपती मेडल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ ५६ व्या दीक्षांत समारंभातील यंदाचे राष्ट्रपती सुवर्णपदक अभिषेक श्रीराम याला जाहीर झाले आहे. साताऱ्याची कीर्ती ननवरे ही कुलपती मेडलची मानकरी ठरली आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दीक्षांत समारंभातील पदवी प्रमाणपत्र वाटप व पदके मिळविलेल्या विद्यार्थ्यांची सोमवारी नावे जाहीर केली. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये सर्वसाधारण कौशल्यासाठीचे भारताचे राष्ट्रपती सुवर्णपदक अभिषेक दादासाहेब श्रीराम याला प्रदान करण्यात येणार आहे. अभिषेक हा शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील विद्यार्थी आहे. आई-वडील दोघेही शिक्षक आहेत. शालेय शिक्षण प्रायव्हेट हायस्कूल व त्यानंतरचे शिक्षण हे विवेकानंद व न्यू कॉलेजमध्ये झाले. एनएसएस, एनसीसीसह विविध उपक्रमांत सहभागी होण्याची संधी मिळाल्याने यशापर्यंत पोहोचता आल्याचे तो सांगतो.

एम.ए. अभ्यासक्रमातील संस्कृत विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या कीर्ती दत्तात्रय ननवरे हिला कुलपती मेडल जाहीर झाले आहे. कीर्तीचे वडील शेतकरी असून, आई गृहिणी आहे. घरची परिस्थिती सामान्य आहे. घरात लहानपणापासून ग्रंथांचे वाचन होत असल्याने संस्कृत विषयाबद्दल आवड निर्माण झाली व करिअर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार संस्कृत विषयातून शिक्षण पूर्ण केल्याचे तिने सांगितले.



“ लेखन व वाचनाची आवड असल्याने हे यश मिळविता आले, याचा आनंद आहे. इंग्रजी विषयाचा प्राध्यापक होण्याचे स्वप्न आहे. नष्ट होणाऱ्या भाषा, मुलांच्या मनातील इंग्रजी विषयाची भीती व उचगाव येथील पारधी समाजाची भाषा यावर संशोधन सुरू आहे.

**- अभिषेक श्रीराम,** राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता




“ कुलपती मेडल मिळविण्यापर्यंत प्रवास खडतर, कष्टाचा आहे. नियमित अभ्यास आणि वाचनामुळे यश मिळाल्याचे समाधान आहे. शिक्षक होऊन विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतची आवडची निर्माण करण्यास प्राधान्य राहील.

**- कीर्ती ननवरे,** कुलपती मेडल विजेती

# राज्यपाल कोश्यारी गुरुवारी कोल्हापुरात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



राज्यपाल भगतसिंग कोश्यारी गुरुवारी (दि.६) कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहेत. सकाळी १० वाजता कोल्हापूर विमानतळावर हेलिकॉप्टरने आगमन होणार आहे. यानंतर ते करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात दर्शनासाठी जाणार आहेत. दर्शनानंतर त्यांचे सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी शिवाजी विद्यापीठात आगमन होणार आहे.

शिवाजी विद्यापीठात आयोजित दीक्षांत समारंभास ते उपस्थित राहणार आहेत. यानंतर ते दुपारी १२.२० वा. कुलपती यांच्या निवासस्थानाकडे प्रयाण करणार आहे. यानंतर दुपारी दोन वाजता ते विमानतळाकडे प्रयाण करणार असून दुपारी सव्वादोन वाजता हेलिकॉप्टरने मुंबईकडे रवाना होणार आहेत.

# विद्यापीठाचा गुरुवारी दीक्षांत समारंभ

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, डॉ. भूषण पटवर्धन यांची उपस्थिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. या दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थान कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी भूषविणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

दीक्षांत समारंभात एकूण ६० हजार १६७ पदव्या स्नातकांना बहाल करण्यात येणार आहेत. यातील २ हजार ६५ स्नातक या दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत, तर महाविद्यालयीन स्तरावर ३५ हजार ६६८ स्नातक पदवी घेणार आहेत. ३५३ स्नातकांना पीएच.डी. पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे. यातील ४३ स्नातकांना व्यासपीठावर पदवी बहाल करण्यात येईल.

दीक्षांत समारंभाची सुरुवात दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी



१० वाजता ग्रंथमहोत्सवासाच्या उद्घाटनाने होणार आहे. दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभाचा मुख्य सोहळा साडेदहा वाजता लोककला केंद्रात मान्यवरांच्या उपस्थित होणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन हे जैवविविधतेचे शास्त्रज्ञ असून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था आणि आयुर्वेद यावर त्यांचे काम आहे.

या दीक्षांत समारंभात डॉ. पटवर्धन हे मार्गदर्शन करणार असल्याचे सांगितले. परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे प्र. संचालक गजानन पळसे यांनी, स्नातकांना पदवी वितरित करण्यासाठी दहा स्टॉल लावण्यात येणार असून महाविद्यालय स्तरावरही पदवी वितरित करण्यात येणार आहेत. तसेच या दीक्षांत समारंभात ६० हजारांहून जास्त पदव्या वितरित करण्यात येणार असल्याने परीक्षा विभागाने याची पूर्ण तयारी केली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. नमिता खोत यांची प्रमुख उपस्थिती होती.

# विद्यापीठात गुरुवारी दीक्षान्त समारंभ

## डॉ. भूषण पटवर्धन प्रमुख पाहुणे ; यंदाही पदवीधरांमध्ये मारली मुलींनीच बाजी

सकाळ वृत्तसेवा



भूषण पटवर्धन

**कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ गुरुवारी (ता. ६) होणार आहे. नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यंदाच्या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे तर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती आज कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, ग्रंथ महोत्सव समन्वयक डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.**

दरम्यान, यंदा पदवीधर होणाऱ्या साठ हजार १६७ स्नातकांपैकी ३२ हजारांवर मुलींचा समावेश असून उच्च शिक्षणात पदवीधर होण्यात यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात यंदाच्या सोहळ्यात सर्वाधिक पदवी व पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. त्यामध्ये विज्ञान, कला, वाणिज्य, मॅनेजमेंट, व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठ प्रांगणात दोन हजार ६५ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे दिली



जातील. गेल्यावर्षीप्रमाणे यावर्षीही महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांमध्येच देण्यात येणार आहेत. ही संख्या ३५ हजार ६६८ इतकी आहे. महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र कार्यक्रमात पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्याच्या सूचना प्रशासनाने प्राचार्यांना दिल्या असून, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे पाठवण्याचे काम सुरू



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेली जय्यत तयारी.**

झाले आहे. पोस्टाने पदवी प्रमाणपत्र स्वीकारणाऱ्या स्नातकांची संख्या २२ हजार ४३४ असून यापैकी दहा हजार २४४ मुले तर बारा हजार १९० मुली आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यासशाखेतून पदवी घेणाऱ्यांची संख्या २९ हजार २३६, वाणिज्य व व्यवस्थापन विषयातून १४ हजार ६४०, मानव्यशास्त्र विषयातून १४ हजार ६४५ तर आंतरविद्या शाखेतून सोळाशे शेहेचाळीस इतके विद्यार्थी पदवी घेणार आहेत.

### ३१० स्नातकांना पीएच.डी.

दीक्षान्त सोहळ्यात एकूण ३१० स्नातकांना पीएच.डी. पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार असून, प्रत्यक्ष व्यासपीठावर फक्त ४३ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण होईल. यावेळी दोन सुवर्णपदकांसह सोळा विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके दिली जातील. बुधवारी (ता. ५) सकाळी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोर ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होईल. गुरुवारी (ता. ६) सकाळी आठ ते साडेनऊ ग्रंथदिंडी आणि पावणेअकरा ते सव्वाबारा या वेळेत मुख्य दीक्षान्त सोहळा होईल.

### दृष्टिक्षेपात दीक्षान्त सोहळा...

**बुधवारी (ता. ५) :** सकाळी दहा वाजता ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन. त्यानंतर साडेअकरा वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा 'गीत बहार' हा कार्यक्रम. ग्रंथ महोत्सवात भारतीय व परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकिज, डिजिटल ग्रंथांच्या तीसहून अधिक स्टॉलचा समावेश असेल. सलग दोन दिवस सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळेत महोत्सव सर्वांसाठी खुला असेल.
**गुरुवारी (ता. ६) :** सकाळी साडेसातला कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ. साडेनऊला दीक्षान्त सभा मंडपात दिंडीची सांगता. सकाळी पावणेअकराला मुख्य दीक्षान्त सोहळ्याला प्रारंभ.

### शिवाजी विद्यापीठांतर्गत परीक्षांच्या तारखा जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत मार्च आणि एप्रिलमध्ये होणाऱ्या परीक्षांच्या प्रारंभ तारखांबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने सर्व महाविद्यालयांना पाठवले आहे. परीक्षा अर्ज सादर करण्यापासून ते बैठक व्यवस्थेसंदर्भातील सर्व सूचना यातून देण्यात आल्या आहेत. २७ मार्चपासून परीक्षांना प्रारंभ होणार असून विविध अभ्यासक्रमांच्या ६८० परीक्षा या सत्रामध्ये होणार आहेत. त्यासाठी ऑनलाईन अर्जाची प्रक्रिया सुरू झाली असून विनाविलंब शुल्कासह अर्ज सादर करण्याची मुदत १७ फेब्रुवारी आहे, तर विलंब शुल्कासह २४ फेब्रुवारी आणि अतिविलंब शुल्कासह २९ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत.